-: प्रकरण दुसरे :-

# वारणा सहकारी संकुल : परिचय

(Warana Co-operative Complex : An Introduction)

# ❁ प्रकरण दुसरे ❁

# वारणा सहकारी संकुल : परिचय

(Warana Co-operative Complex : An Introduction)

## प्रास्ताविक :-

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीमध्ये वारणानगरचे नाव आज अग्रेसर आहे. या प्रकरणात आपण वारणानगरमधील सहकारी संकुलाची माहिती करून घेणार आहोत. वारणानगर हे कोल्हापूर शहरापासून ३२ कि. मी. नंतर उत्तर दिशेला वसलेले पन्हाळा तालुक्यातील गांव आहे.

सन १९५० पर्यंत वारणा परिसर हा ओसाड, निर्जन माळ होता. या परिसरात बोरी-बाभळीची झाडे-झुडपे होती. या ठिकाणी फक्त शेळ्या-मेंढ्यांचा, कोल्ह्या-कुत्र्यांचा वावर होता. दिवसा देखील दरोडेखोरांचा, वाटमाऱ्यांचा सुळसुळाट होता. पण आज हा परिसर पूर्णत: बदललेला आहे. ह्या सर्व बदलाचे मुख्य प्रवर्तक आहेत ते म्हणजे सहकारमहर्षी कै. मा. विश्वनाथ आण्णासाहेब उर्फ तात्यासाहेब कोरे. गेल्या सुमारे अर्धशतकाच्या कालावधीत त्यांनी आपल्या अफाट कर्तृत्वाने वारणा खोऱ्याचा चेहरामोहरा बदलून टाकलेला आहे. वारणा खोऱ्यातील सहकारी संस्था द्वारा ग्रामीण भागात प्रचंड विकास कार्य उभे केलेले आहे. सन १९३५ पासुन त्यांनी आपल्या कार्यास सुरूवात केली. "छोडो भारत" या १९४२ च्या चळवळीमध्ये तात्यांचा सहभाग होता. स्व. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या बरोबरीने त्यांनी काम केले. १९५१ हे वर्ष तात्यासाहेबांच्या जीवनात क्रांतीकारक ठरले. ऊस करी शेतकऱ्यांच्या पुढे 'काळ' उभा राहिला होता. गुळाचे दर एवढे गडगडले होते कि, गुळ करण्यापेक्षा उभा ऊस पेटवून देणे शेतकऱ्यांनी पसंत केले. १९५१ साली ह्या मंदिच्या लाटेमध्ये त्यांनी

आपल्या स्वत:चा ऊसाचा फड पेटवून दिला व गुळ काढणेचे बंद केले. या एकाच घटनेने त्यांच्या मनामध्ये साखर कारखाना चालू करण्याचा ध्यास घेतला.

साखर कारखाना काढण्यासाठी भागभांडवलाची आवश्यकता होती. त्यासाठी त्यांनी वारणेच्या परिसरातील आजूबाजूला असणाऱ्या गावांतील लोकांशी स्वत: भेटून, त्यांच्याशी चर्चा करून तसेच वेगवेगळ्या युक्त्या वापरून, कल्पना सांगुन कारखान्यासाठी पैसा उभा केला. यावेळी प्रसंगी काही व्यक्तींनी आपल्या बायकोच्या गळ्यातील घंठण गहाण ठेवून कारखान्यासाठी भाग भांडवल उभारणीसाठी पैसा उपलब्ध केला. यातून कारखाना उभारणीस सुरूवात झाली.

**श्री वारणा सहकारी साखर कारखाना :-**

२७ सप्टेंबर १९५५ रोजी सहकारी सोसायटी कायद्याखाली साखर कारखान्याची नोंदणी केली. पण खऱ्या अर्थाने श्री वारणा सहकारी साखर कारखान्याची स्थापना दि. १ नोव्हेंबर १९५९ ला झाली व एका नवीन संस्कृतीने जन्म घेतला.

साखर कारखान्याची ध्येय व धोरणे खालीलप्रमाणे होत.

१) ऊस उत्पादक शेतकऱ्यांची सहकारी कारखान्याद्वारे आर्थिक परिस्थिती सुधारणे व शेती मालाला योग्य भाव, बाजारपेठ मिळवून देणे.

२) त्याकरिता वेगवेगळ्या योजना राबविणे.

३) या भागातील रहिवाश्यांच्या सर्वांग सुधारणेसाठी समाज कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करणे.

४) अशाप्रकारे फक्त उत्पादन व बाजारपेठ यापेक्षा सर्वार्थाने समाजाचा विकास करण्यासाठी सहकारी चळवळीचा उपयोग करणे.

सध्या साखर कारखान्याचे भागभांडवल १६ कोटी आहे. प्रत्येक शेअर्सची किंमत ५,०००/- रू. इतकी आहे. कारखान्याचे एकूण सभासद २१,००० इतके आहेत. त्यापैकी ऊस उत्पादक सभासदांची संख्या २०४०५ इतकी आहे. वारणेच्या कार्यक्षेत्रातील ८० गावातील ऊस उत्पादक ज्याला २० गुंठे किंवा त्यापेक्षा जास्त शेतजमीन आहे त्याला तसेच मागासवर्गीय लोकांच्यासाठी १० व ५ गुंठे कमीत-कमी शेतजमीन असणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्याला कारखान्याने सभासद करून घेतले आहे. त्यामुळे ९६% सभासद हे ऊस उत्पादक शेतकरी आहेत.

ऊस उत्पादक शेतकऱ्याला साखर कारखान्यामुळे वेगवेगळ्या पद्धतीने आर्थिक फायदा होऊ लागला व साखर कारखाना प्रगती पथावर पोहोचला.

कारखान्याची गाळपक्षमता १९६९-७० साली २००० ते २५०० मेट्रीक टन प्रतिदिनी होती. सन १९८१-८२ साली २५०० ते ३००० मेट्रीक टन प्रतिदिन इतकी वाढली. सन २०००-२००१ या चालु वर्षी प्रतीदिनी सरासरी ८५०० मेट्रीक टन ऊसाचे गाळप केले जाते. त्याचबरोबर बगॅस व मोलॅसिस सारखे उपपदार्थ तयार करून कारखान्याच्या वार्षिक उत्पन्नात भर घातली जात आहे.

सन १९९९-२००० या गतवर्षीच्या गळीत हंगामामध्ये कारखान्याने १२ लाख ३७४७५ मेट्रीक टन ऊसाचे गाळप करून १४ लाख ४० हजार साखर पोत्यांची निर्मिती केली आहे. त्याचबरोबर सरासरी साखर उतारा १२.५० एवढा होता. तसेच सन २०००-२००१ या चालू वर्षीच्या गळीत हंगामामध्ये एकूण ११ लाख ६९ हजार ९७६ मेट्रीक टन ऊसाचे गाळप करून १४ लाख ८२ हजार १५० साखर पोत्यांची निर्मिती केली आहे. सरासरी साखर उतारा १२.६५ एवढा आहे.

उत्कृष्ठ व्यवस्थापन, कार्यक्षमता, संघटन, कल्पकता, गुणवत्ता, २१ व्या शतकाकडे सामोरे जाण्याची पूर्वतयारी, तसेच सरासरी सर्वात जास्त उत्पादन आणि ऊसासाठी दिला जाणारा दर यामुळे सध्या ''वारणा पॅटर्न'' अनेक सहकारी साखर कारखान्यामध्ये अग्रक्रमात असलेला आढळून येतो आहे.

सन १९८२ पासून कारखान्याचे देशपातळीवरील व राज्य पातळीवरील विविध २६ पुरस्कार मिळविलेले आहेत. या कारखान्याने सर्व उच्चांक मोडले आहेत. १९८८-८९ मध्ये तांत्रिक विभागात देशामध्ये पहिला क्रमांक मिळविला आहे. १९९१-९२ च्या हंगामामध्ये पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट तर्फे दिले जाणारे दक्षिण विभागातील उत्कृष्ठ तांत्रिक कार्यक्षमतेचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहे. देशपातळीवरील नॅशनल शुगर इन्स्टिट्यूट न्यू दिल्ली यांचेतर्फे दिले जाणारे अनेक पुरस्कार कारखान्याने पटकावले आहेत. ''आय. एस. ओ. ९००२'' हे आंतरराष्ट्रीय मानांकन, ''सर्वोत्तम उद्योजकता पुरस्कार'', ''उत्कृष्ठ सहकारी उद्योग समुह'', ''मॅनेजमेंट एक्सलन्स अॅवार्ड'' याशिवाय वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मार्फत प्रतिवर्षी दिला जाणारा ऊसाचे जास्तीत-जास्त उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना '' ऊस भूषण'' पुरस्कार यासारखे पुरस्कार चालू झाल्यापासून गेल्या चार वर्षात कारखान्याच्या शेतकऱ्यांन ऊस उत्पादन वाढीत उच्चांक नोंदविला आहे. एकरी सरासरी उत्पादन मिळविण्यात देखील वारणा सहकारी साखर कारखाना संपूर्ण महाराष्ट्रात आघाडीवर आहे. या सर्व बाबी कारखान्याच्या दृष्टिकोनातून गौरवाच्या आहेत.

ऊस विकास कार्यक्रमाच्या महत्वाच्या नियोजनाचा परिपाक म्हणून वारणा कारखाना ऊसाबाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे. ऊस उत्पादनात वाढ व्हावी या उद्देशाने श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखान्या मार्फत विशेष प्रयत्न केले जात आहेत. ऊस उत्पादन वाढीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी कारखान्याचे कार्यकारी संचालक मा. व्ही. एस्. चव्हाण साहेब, मुख्य शेती अधिकारी ए. ए. पाटील, ऊस पुरवठा अधिकारी बी. आर्. मगदूम आणि ऊस विकास अधिकारी दिपक पाटील आदी सदैव प्रयत्नशील असतात.

सहकार व सामाजिक क्षेत्रात प्रशंसनीय कार्याबद्दल कारखान्याचे संचालक आमदार विनय कोरे यांना ''फाय फाउंडेशनचा सहकार श्री पुरस्कार'' याचबरोबर ''बेस्ट चिफ अॅग्रीकल्चरल'' ऑफीसर म्हणून महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार वारणा कारखान्याचे मुख्य शेती अधिकारी ए.

ए. पाटील यांना मिळालेला आहे. वारणा सहकारी साखर कारखाना ही संस्था संपूर्ण वारणा विविध उद्योग व शिक्षण समुह यांचा आधार आहे.

वारणा साखर कारखान्याने नवीन काही उपक्रम हाती घ्यायचे ठरविलेले आहेत ते म्हणजे १ किलो ते ४ किलो पर्यंत साखरेचे पॅकिंग व ऊसाच्या रसाचे पॅकिंग करून बाजारपेठेत विकण्याचे सुद्धा भविष्यात संकल्पना आहे.

अशाप्रकारे या श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीमुळे फक्त वारणेचाच विकास झालेला नसून वारणा परिसराच्या आजुबाजूला असलेल्या ८० खेड्यांचा देखील विकास झालेला आहे.

**<u>वारणा सहकारी साखर कारखान्याने सुरू केलेले अन्य प्रकल्प</u> :-**

१) <u>वारणा डिस्टलरी</u> :-

सन १९८९ मध्ये कारखान्यातील मोलॅसिस या उपपदार्थाचा उपयोग डिस्टलरी उभारण्यात आली. या उभारणीसाठी रू. ४.१२ करोड खर्च आला. या डिस्टलरीमध्ये उद्योगधंद्याच्या उपयोगासाठी प्रती दिवशी ३०,००० लिटर मोलॅसिसवर प्रक्रिया करून अल्कोहोल तयार केले जाते. या डिस्टलरीपासून वार्षिक उत्पन्न रू. ५ कोटी आहे.

२) <u>वारणा कागद प्रकल्प</u> :-

केंद्र सरकारने अपारंपारिक प्रयोग म्हणून कागद निर्मितीला प्रोत्साहन दिल्यामुळे कारखान्यातील बगॅस या उपपदार्थाचा वापर करून सन १९८३ मध्ये कारखान्याने कागद निर्मिती चा रू. ८.५२ करोड किंमतीचा कारखाना चालू केला. त्याची क्षमता २० टन प्रति दिवशी आहे.

या कागद प्रकल्पा पासूनचे वार्षिक उत्पन्न रू. १० कोटी आहे.

३) **विद्युत प्रकल्प** :-

कागद कारखान्याच्या व डिस्टलरीच्या वाया जाणाऱ्या पाण्यापासुन, मळीपासून विद्युत निर्मितीचा प्रकल्प मे. वेस्टर्न पॅक्स इंडिया लि. या कंपनीने चालू केला आहे. दर दिवशी २०,००० युनिट विद्युत या ठिकाणी तयार करून ती कागद कारखान्यासाठी वापरली जाते.

४) **वारणा बायोअर्थ** :-

अर्कशाळेतील स्पेंटवॉश व कारखान्यातील प्रेसमड यामध्ये मायक्रो जीवाणू मिसळून "वारणा बायोअर्थ" हे कंपोस्ट खत तयार करून शेतकऱ्यांना पुरविले जाते. वार्षिक उत्पन्न ४० लाख आहे.

५) **कामगार कल्याण** :-

वारणा सहकारी साखर कारखान्यामार्फत कामगारांना राहण्याकरिता सर्व सोयीनीयुक्त अशा ४९० घरांची सोय केलेली आहे. तसेच कारखान्यामार्फत कामगाराला किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींसाठी ऑपरेशन अथवा प्रसुती त्याचबरोबर इतर आजारपणावरील उपचाराची व्यवस्था होणेसाठी सर्व सोयींनी युक्त असा ३० कॉटचा दवाखाना उभारला आहे. या दवाखान्यामध्ये सर्व रोग निदान शिबीरे, कान, नाक, घसा, डोळ्यांची शिबीरे, दंत शिबीरे वर्षातून १ ते २ वेळा आयोजीत केली जातात. या शिबीराचा लाभ कामगार, त्यांचे कुटुंबीय त्याचबरोबर ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या कुटुंबासाठी देखील होत असतो.

त्याचबरोबर व्यवस्थापनाच्या पुढाकाराने सहकारी कामगार सोसायटी स्थापन करण्यात आली आहे. या सोसायटीमधून गॅस पुरवठा, बेकरी उत्पादने, पिठाची गिरणी तसेच साखर विक्री, क्रेडिट सुविधा तसेच सायकल, टि. व्ही., रेडिओ अशा मोठ्या वस्तू खरेदीसाठी सुद्धा मदत केली जाते.

कामगारांना बोनस व बक्षिस योजना अस्तित्वात आहेत तसेच वारणा संकुलातील सर्व सहकारी संस्थांतील कामगारांना निवृत्ती वेतन योजना सुरू केलेली आहे.

तसेच श्री वारणा कामगार कल्याण मंडळामार्फत अचानक आजारपणासाठी तसेच मुलांच्या शिक्षणासाठी मदत केली जात आहे.

६) **कृषी विकास** :-

वारणा कारखान्यामार्फत स्वतंत्र असा शेती विकास विभाग स्थापन करण्यात आला आहे. त्याचे व्यवस्थापनासाठी उच्चशिक्षित अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ह्या शेती विभागामधून शेतकऱ्यांना ऊस उत्पादनाबद्दल, ऊस पिकाच्या संगोपनाबद्दल सल्ला व मदत देऊन वैज्ञानिक दृष्टिकोनातून शेती करण्यास मदत व प्रोत्साहन दिले जात आहे. कारखान्याची सुसज्ज अशी माती परिक्षण प्रयोगशाळा आहे. या प्रयोगशाळेत शेतकऱ्यांच्या शेतातील मातीचे एन्. पी. के. प्रमाण पी. एच. प्रमाण विना मोबदला तपासून दिले जाते.

शेतकऱ्यांना निकोप असे ऊस बियाणे कारखान्यामार्फत पुरविले जाते. तसेच स्वत:चे बीयाणे प्लॉट तयार करण्यास शेतकऱ्यांना उद्युक्त केले जाते.

कारखान्याकडे बुलडोझर, ट्रॅक्टर, जी. सी. बी., बोअरींग मशीन असून सवलतीच्या दरामध्ये ते शेतकऱ्यांना पुरविले जाते. तसेच ऊस वाहतुकीसाठी ट्रक, ट्रॅक्टर यासारख्य मोठ्या खरेदीसाठी पैसा उभा करून दिला जातो.

सरकारी ऊस पायलट प्लॉट या कारखान्याकडे उभारण्यात आला आहे. तसेच ऊस उत्पादक, आर्थिक मागासवर्गीय शेतकऱ्यांना वेगवेगळ्या सवलती उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

कारखान्याने प्रायोगिक तत्त्वावर २५ एकर क्षेत्रामध्ये बीयाणे फर्म उभारला आहे. या मार्फत शेतकऱ्यांना नवनवीन बीयाणांचा पुरवठा केला जातो. स्प्रिंकलर व ड्रिप एरिगेशन असा

आधुनिक पद्धतीचा वापर चालू करण्यात आला आहे. कारखान्यामार्फत शेतकऱ्यांसाठी चिक्कू, आंबा, नारळ इ. फळांची रोपे १००% अनुदान देऊन वृक्षारोपणासाठी प्रवृत्त केले जात आहे. आजपर्यंत २.५० लाख रोपे (फळांची) पुरवली आहेत व त्यापासून प्रतीवर्षी २ कोटी रूपयाचे जादा उत्पन्नाचा लाभ शेतकऱ्यांना होत आहे.

**७) <u>पाणीपुरवठा योजना</u> :-**

शेतीसाठी पाणी-पुरवठा करणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. आज चांदोली धरणामुळे वारणा नदी वर्षभर दुथडी भरून वाहत आहे. याचा फायदा घेऊनच आज वारणा कारखान्याने सहकारी तत्त्वावर लहान-मोठ्या ६५ पाणी पुरवठा संस्था उभारल्या आहेत. २ कोटी रूपये खर्चाच्या तीन मोठ्या पाणी पुरवठा संस्थामुळे १५०० एकर क्षेत्र पाण्याखाली आले आहे. त्याचबरोबर ५८२८ विहीरी पाण्यासाठी उपलब्ध असून त्यावरती ६००० एकर क्षेत्र ऊस व अन्य पिकांसाठी ओलिताखाली आले आहे.

**८) <u>सार्वजनिक सेवा</u> :-**

**अ) <u>वाचनालयांना मदत</u> -**

सर्वसामान्य माणसाच्या जीवनामध्ये साहित्यीक बदल घडवून आणण्यासाठी वाचनालये कारणीभूत असतात. वारणा परिसरातील २० गावांमध्ये वाचनालयाच्या ईमारत बांधकामासाठी कारखान्याकडून १,५०,००० रू. ची मदत देऊ केली आहे. तसेच पुस्तके खरेदीसाठी ३५ वाचनालयांना प्रत्येक वर्षी प्रत्येकी १००० रू. ची मदत केली जाते.

**ब) <u>शारिरीक शिक्षण</u> -**

वारणा साखर कारखान्याच्या माध्यमातून "श्री वारणा व्यायाम मंदीर" ही परिपूर्ण व्यायामशाळा वारणानगरमध्ये कार्यरत आहे. या ठिकाणी पारंपारिक कुस्तीबरोबरच आधुनिक शरीरसौष्ठव साठी जी साधने आहेत त्याची मुबलक प्रमाणात उपलब्धता या ठिकाणी आहे. व्यायाम

मंदिरामध्ये होतकरू पैलवानांना राहण्याची सोय केलेली आहे. तसेच वर्षाला भागातील व्यायामशाळांना कारखान्यामार्फत मदत दिली जाते.

**क) <u>गोबर गॅस योजना</u> -**

वारणा कारखान्याच्या माध्यमातून वारणेच्या कार्यक्षेत्रातील गावामध्येआजपर्यंत ३००० गोबर गॅस प्लँट उभे केले आहेत व त्यासाठी भारत सरकारच्या व कारखान्याच्या संयुक्त माध्यमातून ६५,००,००० रू. पर्यंत शेतकऱ्यांना सबसीडी मिळवून दिलेली आहे.

**ड) <u>सार्वजनिक विवाह सोहळा</u> -**

आपलेकडे पारंपारिक पद्धतीने विवाह करणे चालू आहे. त्यासाठी लोक विनाकारण खूप पैसे खर्च करतात व आयुष्यभर त्या कर्जाची परतफेड करतात. म्हणून तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखान्यामार्फत वर्षातून दोन वेळा 'सार्वजनिक विवाह सोहळा' कारखान्याच्या 'लालबहादूर शास्त्रीभवन' या इमारतीमध्ये पार पाडला जातो. त्यासाठी लागणारा खर्च हा कारखाना करत असतो. आजपर्यंत या पद्धतीने ५५ सार्वजनिक विवाह सोहळे पार पाडलेले आहेत व १००० जोडप्यांचे विवाह करून २००० कुटुंबांचा विवाह खर्च वाचवला आहे. तसेच या ठिकाणी या सार्वजनिक विवाह सोहळ्यात विवाह करणाऱ्या नवदांपत्यांना भेट म्हणून कारखान्यामार्फत ७५० रू. ची संसारोपयोगी भांडी दिली जातात व आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना १००० रू. ची भांडी भेट या स्वरूपात दिली जातात.

**इ) <u>कुटुंब नियोजनासाठी प्रयत्न</u> -**

कारखान्यामार्फत कुटुंबनियोजनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. कारखान्याच्या दवाखान्यामध्ये कुटूंब नियोजनाची शिबीरे घेऊन अनेक कुटुंबांना अनुदान देण्यात आले

आहे. प्रत्येक वर्षी साधारणपणे या कार्यक्रमासाठी एक लाख रूपयापर्यंत कारखान्यामार्फत खर्च केला जातो.

**ई) <u>मागासवर्गीयांचे जीवन उंचावण्यासाठी</u> -**

वारणा साखर कारखान्याच्या माध्यमातून गावागावामध्ये कार्यक्षेत्रातील समाजमंदिरे, अस्पृश्यांसाठी पाणी पुरवठा योजना तसेच जमीन सुधारणा यासाठी अनुदान देण्यात आले आहे. तसेच वारणा शिक्षण समुहामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना कारखान्यामार्फत अनुदान देऊन त्यांच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जात आहे.

**उ) <u>वैद्यकीय सेवा</u> -**

वारणा कारखान्याच्या सहकार्याने वारणानगर ह्या ठिकाणी ३० कॉटचा दवाखाना सुरू केला आहे. याठिकाणी वर्षातून वेगवेगळी शिबीरे आयोजित केली जातात. यामध्ये कान, नाक, घसा, डोळा व इतर सर्व रोगनिदान शिबीरे आयोजीत करून रूग्णांना मोफत औषधोपचार केला जातो.

त्याचबरोबर मोठ्या आजारपणासाठी लोकांना शहरांकडे धाव घ्यावी लागते म्हणून तात्यासाहेबांनी वैद्यकीय चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने सन १९९२ मध्ये "महात्मा गांधी मेडीकल" या नावाचे २०० कॉटचे हॉस्पीटल सुरू केले आहे. याठिकाणी अद्यावत मशिनरी, अनुभवी डॉक्टर्स व नर्सेस यांची उपलब्धता आहे. तसेच वारणा कारखान्याच्या कामगारांना, सभासदांना याठिकाणी बीलामध्ये ठरावीक सवलत दिली जाते.

**<u>श्री वारणा सहकारी साखर कारखान्याशी संलग्न असणाऱ्या वारणानगरधील सहकारी संस्था</u> :-**

श्री वारणा सहकारी साखर कारखाना यांच्या माध्यमातून वारणानगरमध्ये अनेक सहकारी संस्था उदयास आल्या आहेत. त्यांचा अल्पपरिचय खालीलप्रमाणे करून देता येईल

१) **<u>श्री वारणा सह. दूध उत्पादक प्रक्रिया संघ लि. तात्यासाहेब कोरे नगर</u> :-**
**(वारणा सहकारी दूध संघ)**

श्री वारणा सहकारी साखर कारखान्याच्या प्रेरणेने दि. २० जुलै १९६८ रोजी श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघाची स्थापना झाली. वारणा खोऱ्यातल्या खेड्यापाड्यातल्या शेतकरी, कामगार यांच्या घरात निर्माण होणाऱ्या दूधाने त्याला समृद्ध करणेसाठी ते दूध योग्य पद्धतीने शहरात जायला हवे. त्यासाठी ते गावागावातील सहकारी दूध संस्थामध्ये (डेअरी) जाणे, त्याची वाहतूक होणे, दूधावर योग्य प्रक्रिया करणे, त्यापासून वेगवेगळी उत्पादन तयार करणे, त्यांचे आकर्षक पॅकींग तयार करणे व योग्य तयार झालेला माल हा निर्दोष यंत्रणेमार्फत बाहेरगावी पोहचविणे यासाठी एक पायाभूत भक्कम व्यवस्था उभारणे व मुख्य म्हणजे दूध प्रक्रिया करणारी कारखानदारी ही शेतकऱ्यांच्या मालकीची असावी आणि त्या कारखानदारीची स्वत:ची विक्री व्यवस्था असावी ह्या मुख्य हेतूने कै. मा. तात्यासाहेबांनी वारणा दूध संघाची निर्मिती केली. केवळ ऊस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचेच नव्हे तर वारणा खोऱ्यातील ग्रामीण परिसरातील इतर लोकांच्या जीवनात सुधारणा घडून आली पाहिजे अशी तात्यासाहेबांची प्रामाणिक इच्छा होती. म्हणूनच त्यांनी दूध संघाची स्थापना केली.

२ लाख लिटर दूधावर प्रक्रिया करण्याची क्षमता असलेल्या या दूध संघाकडे कार्यक्षेत्रातील व बाहेरील सीमा भागातून जवळ जवळ सरासरी २ ते २.५ लाख लिटर दररोज दूध गोळा होते. यापैकी एकट्या मुंबई शहरास दररोज ३५,००० लिटर दूध हे प्लास्टिकच्या पिशवीतून पुरविले जाते व उरलेल्या दूधावर प्रक्रिया करून दूध पावडर, तूप, बदाम-पिस्ता व केशर, वेलची या दोन स्वादातले श्रीखंड, आम्रखंड, एनर्जी फुड स्टॅमीना, वारणा टेबल बटर, वारणा चीज, स्ट्रॉबेरी डेझर्ट, वारणा लस्सी अशा एकापेक्षा एक अशा प्रकारची सरस उत्पादने वारणा दूध संघामार्फत तयार केली जातात.

सन १९९९-२००० या साला अखेरीस संघाकडील 'अ' वर्ग सभासद संख्या १५,४८५ तर 'ब' वर्ग सभासद संस्था २५१ आहे. तसेच सभासद वसुल भाग-भांडवल रू. १,५७,१९,०८८ इतके झालेले आहे. तसेच सन १९९९-२००० या वर्षाच्या अखेरीस संघाचे कार्यक्षेत्रातील व सीमा भागातील इतर संघाकडील म्हैशीचे एकूण ५,५९,९७,४१९.८ इतके लिटर दुध वारणा संघाकडे जमा झाले आहे व गायीचे संघाचे कार्यक्षेत्रातील व सीमा भागातील इतर संघाकडील एकूण दूध २,७५,३१,८१८.५ लिटर संघाकडे जमा आहे. या दोन्ही दूधाचे रोजचे सरासरी संकलन प्रमाण अनुक्रमे १,३८,३५३.३ लि. (म्हैशीचे दूध) व ९०,४९३.८ लिटर (गाईचे दूध) एकूण २,२८,८४७.१ लि. दूध वारणा संघाकडे दररोज संकलन केले जाते.

या वारणा दूध संघामुळे वारणा परिसरातील व सीमा भागातील शेतकऱ्यांना दुग्धोत्पादन हा हमखास अर्थाजनाचा जोडधंदा झाला आहे. एका वर्षासाठी ५००० रूपयांपासून ते २५ ते ३० हजार रूपयांपर्यंत दूधापासून निव्वळ उत्पन्न मिळविणारे शेतकरी या भागात दिसू लागले आहेत. दूध पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा वारणा संघामार्फत अधिक दर दिला जातो.

वारणा दूध संघाने दूधातील नैसर्गीक घटक जपण्याकरिता व त्याची शुद्धता राखण्याकरिता एक घडीच बसवली आहे. याच कारणांमुळे वारणा दूध लोकप्रिय झाले आहे. वारणा श्रीखंड, तूप, लस्सी, दूध, दूध पावडर मुंबईसारख्या ठिकाणी लोकप्रिय झालेले आहे. उत्तम स्वाद, गुणवत्ता या लोकप्रियता मिळविलेल्या या संघाने आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेत उतरण्याची जय्यत तयारी केली आहे. ''आय. एस्. ओ. ९००२'' हे आंतरराष्ट्रीय मानांकन वारणा दूध संघाने पटकाविले आहे.

वारणा दूध संघामार्फत अनेक <u>विकासात्मक कार्यक्रम</u> राबविले जात आहेत. यामध्ये खालील कार्यक्रमांचा समावेश होतो आहे.

१) **दुध उत्पादन संस्था प्रतिनिधी प्रशिक्षण** -

दूध व्यवसायातील नवीन शास्त्रीय माहिती, नवीन झालेल्या सुधारणा व व्यवस्थापनातील आवश्यक माहिती, दूध उत्पादक संस्था पदाधिकारी व कर्मचारी यांना चर्चासत्रे, शिबीरे, मासिक मिटींग आयोजीत केल्या जातात.

२) **दुध उत्पादक जिवित सुरक्षा व सामाजिक सुरक्षा योजना** -

दूध उत्पादक नैसर्गीक किंवा अपघाताने मयत झाल्यास त्याचे कुटूंबियांना आर्थिक मदत दिली जाते. तसेच दूध उत्पादकांचा नैसर्गीक मृत्यू झाल्यास अपघात, अपंग झाल्यास दूध उत्पादकांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत व्हावी या उद्देशाने दूध उत्पादकांचा विमा उतरविला आहे. सन १९९९-२००० या सालात विमा कंपनीकडून २३७ दूध उत्पादकांच्या कुटूंबियांना १३,१२,५००/- रू. इतकी मदत मिळाली आहे.

३) **दुध व्यवसाय स्पर्धा व जातीवंत जनावरांचे प्रदर्शन** -

दूध उत्पादक, दूध संस्था व व्यवस्थापन यामध्ये चाललेल्या कामाची नोंद घेणे, ते काम सर्वांना माहित होणे व त्या कामाचे कौतुक व्हावे या उद्देशाने दुग्ध व्यवसाय विकास कार्यक्रमांतर्गत भागातील दूध उत्पादक, संस्था व त्यांचे व्यवस्थापन यांच्या स्पर्धा घेऊन यशस्वी स्पर्धकांना पुरस्कार, पारितोषिके दिली जातात. प्रतीवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेदिवशी जातीवंत जनावरांचे प्रदर्शन भरविले जाते व यशस्वी स्पर्धकांना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाची बक्षीसे वाटप केली जातात.

## १) वारणा दुध संघाशी संलग्न असलेल्या संस्थाचा परिचय :-

१) **अमृत सेवक सहकारी पतसंस्था** :-

कामगारांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी व त्यांना जीवनावश्यक वस्तु पुरविणेसाठी ही नोकरांची पतसंस्था आहे. या संस्थेमार्फत कर्जवाटप, प्रोव्हीजन स्टोअर्स, साखर

खरेदी-विक्री, रॉकेल वाटप, दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री व्यवहार केले जातात. या संस्थेची नेरूळ (नवी मुंबई) या ठिकाणी शाखा आहे. कामगारांना पगाराचे प्रमाणात क्रेडिटवर जीवनावश्यक माल पुरविला जातो. तसेच जास्तीत जास्त ५०,००० रूपयांपर्यंत कर्ज दिले जाते. संस्थेची वार्षिक उलाढाल रू. ८.३७ कोटी आहे व सभासद संख्या १५१४ इतकी आहे.

२) **अमृत कामगार कल्याण मंडळ** :-

या मंडळामार्फत कर्मचाऱ्यांच्या मुलांना शालेय क्रमिक पुस्तके, वह्या मोफत वाटप करण्यात येतात. तसेच मयत कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत दिली जाते. मंडळामार्फत विविध क्रिडा स्पर्धा, रक्तदान शिबीरे वगैरे कार्यक्रम राबविले जातात.

३) **तात्यासाहेब कोरे सहकारी दूध-साखर वाहतूक संस्था मर्या., वारणानगर** :-

वारणा संकुलातील सहकारी संस्थांच्या नवनिर्मितीमध्ये वाहतूक क्षेत्रामध्ये या सहकारी संस्थेची स्थापना झाली आहे. संस्थेच्या सभासदांना उत्पन्नाचे साधन मिळवून देण्याबरोबरच दूध संघ व इतर संस्थांना आवश्यक ती सेवा उपलब्ध झाली आहे. दूध संकलन, दूध व दुग्धपदार्थ वितरण, फर्नेस ऑईल, मोलॅसिस, वाहतूक इ. कामे या संस्थेमार्फत केली जातात. या संस्थेच्या सेवेमुळे दूधाची प्रत व दूध व दुग्धजन्य पदार्थांचे वेळेत वितरण व इतर मालाचा निर्भेळ व वेळेत पुरवठा होत असल्यामुळे दूध संघाचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे. या संस्थेकडे लहान-मोठ्या मिळून एकूण १२० गाड्या असून वार्षिक उलाढाला रू. ७ कोटी इतकी आहे.

४) **अमृत भगिनी मंडळ** :-

या संस्थेमार्फत दूध पॅकींगसाठी आवश्यक असणाऱ्या पॉलिथीन फिल्मचा पुरवठा संघास, तसेच कर्नाटक मिल्क फेडरेशन यांना करण्यात येतो. या संस्थेची सभासद संख्या, १,३९५ इतकी आहे. संस्थेच्या मालकीचा स्वत:चा अद्यावत फिल्म प्लँट असून उत्पादित फिल्मची क्वॉलिटी

उत्कृष्ठ आहे. तसेच या संस्थमार्फत कोल्हापूर मधील अंगणवाड्यांना व बालवाड्यांना सकस आहाराचा पुरवठा केला जातो. या संस्थेची वार्षिक उलाढाल रू. २.५ कोटी झाली आहे.

### ५) सावित्री महिला औद्योगिक सहकारी संस्था :-

ह्या संस्थेची स्थापना दि. २४/१/१९८५ रोजी झाली आहे. दूध संघाच्या कर्मचाऱ्यांची पत्नी किंवा घरातील महिलांना या संस्थेमध्ये सभासदत्व दिले आहे. संस्थेच्या १५८३ इतक्या महिला सभासद असून संस्थेचे व्यवस्थापन महिला मार्फतच पाहिले जाते. कर्मचाऱ्यांच्या किंवा भागातील इतर गरजु महिलांना रोजगाराचे साधन या संस्थेमुळे मिळाले आहे. या संस्थेमार्फत प्लॅस्टिकच्या विविध वस्तुंचे उत्पादन केले जाते. दूध संघास आवश्यक असणाऱ्या श्रीखंड कप व झाकण याबरोबरच कॅडबरी, ग्लॅस्को, अमूल, गोकुळ, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध संघ (महानंद) यांना आवश्यक असणारे प्लॅस्टिकचे कप, झाकणे व चमचे इ. मालाचा पुरवठा या संस्थेमार्फत करणेत येतो. संस्थेची वार्षिक उलाढाल रू. २.०० कोटी इतकी आहे. संस्थेमार्फत पिठाची गिरणी व लाँड्री यासारख्या सेवा दिल्या जातात.

### ६) मालटेड फूड फॅक्टरी :-

या विभागामार्फत कॅडबरी इंडिया लि., यांचे बोर्नव्हिटा व ड्रिंकींग चॉकलेट, कोको पावडरचे उत्पादन व पॅकींग केले जाते. सन १९९९-२००० सालामध्ये ५,८१२.१७६ मेट्रीक टन बोर्नव्हिटाचे उत्पादन केले असून कोको पॅकिंग ९७.१८० टन व ड्रिंकींग चॉकलेट २२६.४३२ टन पॅकिंग चे काम केले आहे.

## २) सह्याद्री कुक्कुट पालन सहकारी संस्था, वारणानगर :-

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी वर्गाला नवीन किफायतशीर जोड व्यवसाय द्यावा या उद्देशाने तात्यासाहेबांनी २७ डिसेंबर १९६३ रोजी श्री. वारणा कोंबडी सहकारी संघाची

स्थापना केली. सहकारी संस्थेमार्फत कुक्कुटपालन वर्ग आयोजीत करून हा व्यवसाय करणाऱ्या छोट्या व्यावसायिकांना या संस्थेमार्फत मदत केली आहे. यामध्ये कुक्कुटपालन सहकारी संस्थेमार्फत कोंबड्या, कोंबडी खाद्य, औषधे, तांत्रिक मार्गदर्शन आणि अंडी विक्री व्यवस्था उपलब्ध करून दिली जाते. सध्या वारणा कोंबडी संघामध्ये ७०,००० पेक्षा अधिक पक्षी आहेत.

त्याचबरोबर या संघाशिवाय वारणा साखर कारखान्याचे काही सभासद व कर्मचारी यांनी एकत्र येवुन सह्याद्री कुक्कुटपालन संस्था दि. १८/७/१९६८ रोजी स्थापन केली आहे. याठिकाणी पक्षी आहेत व वार्षिक उलाढाल रू. ४७,००,०००/- इतकी आहे.

## ३) श्री वारणानगर सहकारी बँक लि., वारणानगर :-

वारणा परिसरातील तसेच कार्यक्षेत्रातील शेती ह्या प्रमुख व्यवसायाला सहाय्य करण्यासाठी व शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या संस्था निर्माण करण्याच्या मुख्य हेतूंनी कै. तात्यासाहेब कोरे यांनी दि. २८ फेब्रुवारी १९६६ साली श्री वारणा सहकारी बँकेची स्थापना केली. या बँकेद्वारे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी तसेच उद्योगधंद्यासाठी कर्जाचा पुरवठा केला जाऊ लागला.

श्री वारणा सहकारी बँकेने १५०० ते १८०० एकर जिराईत जमीन बागायती व्हावी यासाठी शेतकरी बंधूना कर्ज पुरवठा केला आहे. तसेच लहान पाणी पुरवठा योजनांकरीता इलेक्ट्रीक मोटर्स, ऑईल इंजिन्स, पंप्स्, पाईप्स, यासाठी कर्ज पुरवठा केला आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी अशा प्रकारच्या व्यवसायातल्या उच्च शिक्षणाकडे जाणाऱ्या विद्यार्थ्याला कर्जरूपाने मदत केली आहे. तसेच वारणा परिसरातील विविध गावांमधील हायस्कूलच्या इमारती, प्रयोगशाळा इमारती यासाठी कर्ज पुरवठा केला आहे. बँकेमार्फत भागातील लोकांना घर बांधणेसाठी, मुला-मुलींचे विवाह कार्यासाठी, शेती विकासासाठी, वाहन खरेदीसाठी मेंबर जामीन कर्ज स्वरूपात कर्जाचा पुरवठा केला आहे. गरीब व होतकरू मुलांना, विद्यार्थ्यांना बँकेमार्फत बिनव्याजी कर्जपुरवठा करून उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जात आहे.

श्री वारणा सहकारी बँकेमध्ये विशेष करून अर्बन बँकिंग क्षेत्रात न आढळणाऱ्या योजना सुरू केल्या आहेत. यामध्ये बालकल्याण सर्टिफिकेटस्, निवृत्ती वेतन सर्टिफिकेटस्, रिकरिंग डिपॉझीट योजना, मुदत ठेवीवर मासिक व्याज योजना यासारख्या योजना वारणा बँकेत कार्यरत आहेत.

श्री वारणा बँकेची वार्षिक उलाढाल ३० ते ३५ करोड रूपये इ. आहे. या बँकेचे मुख्य कार्यालय वारणानगर या ठिकाणी आहे व तिच्या कोल्हापूर इचलकरंजी, जयसिंगपूर, वडगांव अशा शहरांमध्ये शाखा विस्तार आहे. सन १९९९-२००० या वर्षामध्ये वारणा बँकेने नवी मुंबई, वाशी या ठिकाणी अद्यावत बँकेची शाखा सुरू केली आहे. वारणा बँकेच्या आजअखेर २२ शाखा वारणेच्या परिसरात कार्य करित आहेत. आज वारणा संकुलातील सर्व आर्थिक व्यवहार हे वारणा बँकेच्या मार्फत होत आहेत असे आपणांस दिसून येते. ३१ मार्च, २००१ या बँकेच्या वार्षिक अहवाला अखेरीस बँकेकडे ११३ कोटी ६६ लाख ६८ हजार इतक्या ठेवी आहेत. ७७ कोटी ६२ लाख ५४ हजार रू. कर्जपुरवठा केला आहे. १२८ कोटी ६५ लाख २८ हजार रू. खेळते भांडवल आहे. १४८९२ एवढे सभासद आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये ही एकच अशी बँक असेल की, ज्या बँकेचे मुख्य कार्यालय हे ग्रामीण भागात आहे व शाखा विस्तार हा संपूर्ण शहरी भागात आहे. आज वारणा बँकेच्या मुख्य कार्यालयापासून ते संपूर्ण शाखांमध्ये संपर्णू व्यवहार हे संगणकीकरणाच्या माध्यमातून केले जात आहेत.

### ४) श्री वारणा ॲग्रीकल्चरल गुडस् प्रोसेसिंग को-ऑप. सोसायटी लि. वारणानगर (वॅप्कॉस) :-

श्री वारणा ॲग्रीकल्चरल गुडस् प्रोसेसिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटी या संस्थेची स्थापना सन १९९७ साली झाली.

श्री वारणा सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमनसो कै. विलासरावदादा कोरे यांचे स्वप्न होते कि, वारणा परिसरामध्ये जास्तीत जास्त ऊस पिकविला जातो. तेंव्हा ह्या ऊस पिकाच्या

13820
A

जमिनीची दोन-तीन वर्षामधून अदलाबदल करून त्या ठिकाणी फळझाडे लावायची. उदा. आंबा, केळी, पपई, पेरू इ. व या फळांचा रस (प्यूरी) काढून तो परदेशामध्ये पाठवायचा. ह्या त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी वारणा कारखाना व डेअरीच्या माध्यमातून वारणानगरमध्ये फळ प्रक्रिया करणारा कारखाना सुरू केला आहे. ह्या प्रकल्पासाठी अमेरिकेतून अद्यावत अशी मशीनरी खरेदी करण्यात आली आहे. ह्या संपूर्ण प्रकल्पाची किंमत ४० कोटी रू पर्यंत आहे.

ह्यासाठी शेतकऱ्यांना ह्या कंपनीमार्फत अद्यावत अशी फळझाडांची रोपे पुरवली जातात. वॅफ्कॉस म्हणजे फळप्रक्रिया कारखाना हा सहकारी तत्वावरील पहिलाच कारखाना आहे कि त्याला केडिक बँक एन्. व्ही. यांनी अर्थसहाय्य केले आहे. हा फळ प्रक्रिया प्रकल्प हा १००% निर्यात प्रकल्प आहे. या कारखान्यामध्ये हंगामानुसार आंबा, केळी, पपई, पेरू यासारख्या फळावर प्रक्रिया करून त्यांची पल्प व प्युरी तयार केली जाते व हवाबंद डब्यामध्ये पॅकींग करून परदेशामध्ये पाठविले जाते.

## ५) वारणा वायर्ड व्हिलेज प्रोजेक्ट :-

प्रस्तुत उपक्रम हा पंतप्रधान कार्यालयातून माहिती तंत्रज्ञानाचा ग्रामीण भागामध्ये प्रसार करण्यासाठी कार्यान्वित करण्यात आला आहे. या उपक्रमामध्ये भारत सरकारसोबत, महाराष्ट्र शासन व वारणा विविध उद्योग व शिक्षण समुह यांचा समावेश आहे.

भारतातील ग्रामीण भागात माहिती व तंत्रज्ञानाचा प्रसार करणे हे या उपक्रमाचे मुळ उद्दिष्ट आहे. यामुळे सरकार व जनता यातील संवाद सुरळीत होऊ शकेल अशी आशा आहे. या अंतर्गत वारणा परिसरातील ७० खेड्यांमध्ये प्रत्येकी एक असे माहिती केंद्र उभारण्यात आले आहे. ही सर्व माहिती केंद्रे वारणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील मुख्य केंद्राशी सार्वजनिक दूरध्वनी माध्यमाद्वारे जोडली गेलेली आहेत. प्रत्येक माहिती केंद्रात एकेक संगणक प्रणाली असून ती

संगणकीकृत जाळ्याद्वारे मुख्य केंद्राशी जोडली आहेत. ही सर्व संगणक प्रणाली खेड्यातील जनतेच्या वारणा प्रभागाशी तसेच इंटरनेटद्वारे सर्व जगाशी जोडली आहे.

विविध प्रस्तावित कार्यापैकी सद्यस्थितीत साखर कारखाना व त्याच्याशी संबंधीत इतर माहिती उदा. ऊसाची नोंद, ऊसाचे क्षेत्र, ऊस लागण नोंदणी, ऊस हंगाम कार्यक्रम, ऊसाचे वजन, ऊसाचे बील आणि अशा प्रकारची इतर माहिती प्रत्येक शेतकऱ्याला ह्या माध्यमाद्वारे आपल्या गावागावामध्ये उपलब्ध होऊ लागली आहे. त्यामुळे त्याचे कारखान्यापर्यंत येण्याचे श्रम, वेळ व पैसा वाचवलेला आहे. तसेच भविष्यामध्ये या प्रकल्पाद्वारे शेतजमीनीचे ७/१२ उतारे व राहत्या घराची प्रॉपर्टी कार्डे देखील प्रत्येक गावागावामध्ये ह्या माध्यमातुन पुरवली जाणार आहेत. तसेच प्रत्येक खेड्यांमध्ये (त्या कार्यक्षेत्रातील) पिकाची अद्यावत माहिती मार्गदर्शन, सल्ला, वेगवेगळ्या बाजारपेठांमधील वस्तुंचे दर हे या उपक्रमाद्वारे उपलब्ध होत आहेत. त्याचबरोबर शिक्षणासंबंधी माहिती शाळांची, विद्यापीठांची संख्या या प्रकल्पामध्ये उपलब्ध आहे.

या उपक्रमाद्वारे दूध संकलन केंद्राची सर्व माहिती प्रसारित करण्याचे प्रस्तावित आहे. आज दूधाचा दर व दूधाची प्रत यांच्या दुग्धउत्पादक शेतकऱ्याला माहिती, त्याचा जमा खर्च, पशुसंवर्धनाची माहिती ही अल्पावधीतच ह्या ७० गावांमधील शेतकऱ्यांना, सभासदांना त्यांच्या गावातील केंद्रामध्ये उपलब्ध करण्यात येणार आहे.

बँकांच्या स्वायत्तीकरणाचा भाग म्हणून साखर कारखाना, दूध संस्था आणि इतर उद्योग संस्था ह्या उपक्रमाद्वारे बँकेशी जोडल्या आहेत. जे शेतकरी कारखान्याला ऊस पुरवितात, आणि दूध संस्थेला दूध पुरवठा करून त्यांना आपला बँक बॅलन्स खात्याविषयीची माहिती या उपक्रमाद्वारे मिळू शकते.

वारणा बझार ही सहकारी संस्था वारणानगरमध्ये कार्यरत आहे. तिच्या एकूण ३२ शाखा आहेत. सध्या इतर शाखांना लागणारा माल हा मुख्य ऑफिस वारणानगर शाखेमधून पुरविला

जातो. ह्या शाखा एकमेकांना ह्या उपक्रमाद्वारे जोडल्या गेल्या आहेत. त्यामुळे क्षणार्धात कोणत्याही शाखेची कोणतीही माहिती मिळू शकते. हे ई-कॉमर्सचे ह्या वेबसाईट उदाहरण आहे.

वारणा सहकारी संस्थातील कर्मचारी, शेतकरी, सभासद व इतर लोकांसाठी महात्मा गांधी मेडिकल हे सुसज्ज हॉस्पिटल आहे. ह्याकरिता लोकांच्या सोयीसाठी 'इ मेडीसीन' ह्या वेबसाईटच्या द्वारे सर्व लोकांना आपल्या गावातील केंद्रामध्ये तज्ञ डॉक्टरांची माहिती, रोगांची माहिती आणि अद्यावत साधनांचा वापर याची माहिती इंटरनेटद्वारा पुरविली जाते.

या उपक्रमातील तांत्रिक बाबींसाठी लागणे मनुष्यबळ हे वारणा परिसर व वारणा अभियांत्रिकी महाविद्यालयाने पुरविले आहे.

## ६) वारणा शिक्षण समुह :-

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास, चारित्र्यवर्धन व त्यांच्यामध्ये स्वयंप्रेरणा, आत्मविश्वास, स्वतंत्रवृत्ती निर्माण करण्याची क्षमता, शिक्षणात असली पाहिजे अशी तात्यासाहेबांची धारणा होती. जे शिक्षण स्वावलंबी बनवत नाही, जगण्याचा आत्मविश्वास निर्माण करत नाही ते शिक्षणच नव्हे अशी तात्यांची भूमिका होती. ग्रामीण भागातील तरूणांना उच्चतम शिक्षणाचा लाभ व्हावा त्यांच्या कर्तृत्वाला वाव मिळावा, विशाल कार्यक्षेत्र लाभावे अशी तात्यासाहेबांची इच्छा होती.

वारणा विभाग शिक्षण मंडळाने "नव मानव साकारू, हाच शिक्षणाचा महामेरू" हा मंत्र घेवून वारणा खोऱ्यातील युवकांना शिक्षणाची दारे उघडली आहे. शिक्षणाद्वारे चारित्र्यसंपन्न, स्वावलंबी व कार्यक्षम असा 'नवा माणूस' घडविण्यासाठी कै. मा. तात्यासाहेबांनी १३ जुलै १९६४ साली "श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाची" स्थापना केली.

तेंव्हापासून वारणा खोऱ्यातील युवकांना प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षणाची संधी तसेच जीवनाच्या नवीन क्षेत्रात प्रगती करण्याची संधी उपलब्ध करून काम सुरू झाले आहे. वारणा नगरीत बालवाडीपासुन महाविद्यालयीन शिक्षणाची सोय झाली आहे.

**<u>श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाच्या विविध शिक्षण संस्था पुढील प्रमाणे</u> :-**

**१) <u>श्री वारणा महाविद्यालय, वारणानगर</u> :-**

सन १९६३ मध्ये भागातील सर्व माध्यमिक शाळांचा सर्व्हे करण्यात आला त्यावेळी असे दिसून आले की, माध्यमिक शिक्षण झालेनंतर केवळ १०% मुलेच फक्त महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी शहरांकडे जातात. कारण उर्वरित ९०% मुलांना शहरात जाऊन शिक्षण घेणे हे घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे जमत नव्हते म्हणून सर्वप्रथम श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाने सन १९६४ मध्ये श्री वारणा महाविद्यालयाची स्थापना केली. आज या महाविद्यालयात कला, वाणिज्य व शास्त्र या तीन शाखांचे पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जात आहे.

या महाविद्यालयाचे वैशिष्ठ्य म्हणजे उच्च विद्याविभुषीत अनुभवी शिक्षक स्टाफ आहे. तसेच सुसज्ज प्रयोगशाळा व ग्रंथालय आहे. त्याचबरोबर वारणा सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून व विद्यापीठ अनुदान मंडळाच्या अनुदानातून १५०० मुले, ३०० मुली व १०० शिक्षक स्टाफ राहण्याकरिता अनुक्रमे वसतीगृहांची व निवास स्थानांची सोय केली आहे. या महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांच्या विकासासाठी एन. एस. एस., एन. सी. सी., सांस्कृतीक कार्यक्रम, परंपरा दिन असे विविध उपक्रम राबविले जातात. सन २०००-२००१ सालातील एकूण विद्यार्थी संख्या २,०८९ आहे. सध्या या महाविद्यालयाच्या नावाचे नुतनीकरण करण्यात आले आहे. आज हे वारणा महाविद्यालय 'यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय' या नावाने ओळखले जाते.

**२) श्री वारणा विद्यामंदिर, वारणानगर :-**

सन १९६६ मध्ये श्री वारणा विद्यामंदिर या शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये श्री वारणा विद्यामंदिर या संस्थेने नवे किर्तीमान प्रस्थापित केलेले आहेत. या विद्यामंदिरामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न केले जातात. वक्तृत्व स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, विज्ञान स्पर्धा, पाठांतर स्पर्धा इ. विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजीत केल्या जातात. या ठिकाणी १ ते ४ पर्यंत वर्ग आहेत व एकूण ७५० विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत.

**३) श्री वारणा शिशुविहार, वारणानगर :-**

जुन १९६६ पासून श्री वारणा विद्यामंदिरामध्ये ३ ते ५ वर्षे वयोगटातील मुलांसाठी शिशु विहार सुरू करण्यात आले आहे. या शिशुविहारांमध्ये शिशुंचा शारिरीक व मानसिक विकास व्हावा म्हणून त्यांना स्वच्छता, निटनेटकेपणा व स्वावलंबन यांचे शिक्षण दिले जाते. प्रार्थना, भजने, समुहगीते, अभिनय गीते, विविध प्रकारचे खेळ यामुळे शिशुविहार हे वारणा परिसरातील मुलांचे आवडते ठिकाण बनले आहे. याठिकाणी दरवर्षी सर्वसाधारणपणे १६० एवढ्या मुलांना प्रवेश दिला जातो.

**४) श्री वारणा विद्यालय, वारणानगर :-**

सन १९६९ साली नवोदय विद्यालयाच्या तत्वावर विद्यालयाची स्थापना झाली. या ठिकाणी इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतची शाळा आहे. वारणानगर येथील श्री वारणा विद्यालयाची ख्याती ही महाराष्ट्राप्रमाणेच अन्य राज्यामध्ये देखील पसरली आहे. या वारणा विद्यालयाचे एक वैशिष्ठ्य आहे ते म्हणजे स्वयंशिलता, श्रमप्रतिषठा आणि नियमितपणा यांच्या माध्यमातून वसतिगृहातील विद्यार्थ्यांवर सुसंस्कार केले जातात. म्हणून या वसतीगृहाची कोणत्याही प्रकारची जाहिरात न करता असंख्य पालक आपल्या पाल्यांना वसतीगृहात प्रवेश मिळावा म्हणून इच्छुक असतात.

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात या विद्यालयातील एकूण विद्यार्थी संख्या ८५० एवढी आहे. व वसतीगृहात राहणारे विद्यार्थी संख्या २५० आहेत.

५) **श्री वारणा बालवाद्यवृंद, वारणानगर** :-

कै. मा. तात्यासाहेबांनी सन १९६९-७० साली वारणा बालवाद्यवृंदाची स्थापना केली. हा बाल वाद्यवृंद हा वारणा समुहातील एक आगळावेगळा आणि वैशिष्ठ्यपूर्ण उपक्रम आहे. याचे नाव आज महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण भारतभर पसरलेले आहे. केवळ या उपक्रमामुळेच वारणेचे नांव अत्यंत जलदगतीने संपूर्ण देशातच नाही तर देशाच्या सीमा पार करूनही परदेशातही पोहोचले आहे.

या वारणा बालवाद्यवृंदामध्ये ८ ते १५ वर्षे वयोगटातील सुमारे ४० मुले-मुली निरनिराळी ४५ प्रकारची वाद्ये अत्यंत सहजपणे हाताळतात. वेगवेगळ्या गाण्यांना वेगवेगळी वाद्येही दिली जातात. यामुळे एक मुलगा ४ ते ५ वाद्ये वाजविताना दिसतो. या कार्यक्रमामध्ये भारतातील शास्त्रीय संगीत, हिंदी आणि मराठी लोकगीते, सिनेमागीते, लोकनृत्ये, तसेच देशभक्तीपर गीते यांचा समावेश आहे.

युगोस्लाव्हीयातील सिबेनिक या ठिकाणे सन १९७६ साली झालेल्या आंतरराष्ट्रीय बालमहोत्सवामध्ये या भारताच्या ऑर्केस्ट्राचा प्रथम क्रमांक आला व याबद्दल वारणेच्या बालवाद्यवृंदाला याठिकाणी सुवर्णपदक प्राप्त झाले.

या वारणा बालवाद्यवृंदाचे एक वैशिष्ठ्य म्हणजे या ठिकाणी मुलांना शिकविण्यासाठी स्त्री शिक्षकाची नेमणूक केली आहे. याचे कारण म्हणजे स्त्रिया ह्या मुलांवर जसे संस्कार करतात त्याप्रमाणे पुरूषांना शक्य होत नाही.

**तंत्र शिक्षण संस्था** -

वारणा परिसरातील विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने स्वावलंबी करण्यासाठी तांत्रिक शिक्षण देणे गरजेचे होते. ही काळाची गरज ओळखून शिक्षण मंडळाने

१) तात्यासाहेब कोरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वारणानगर,

२) तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, वारणानगर,

३) तात्यासाहेब कोरे ट्रेनिंग कम प्रॉडक्शन सेंटर, वारणानगर

या तंत्रशिक्षण संस्थांची स्थापना केली.

**६) तात्यासाहेब कोरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय. टी. आय.) :-**

श्री वारणा विभाग शिक्षण मंडळामार्फत ऑगस्ट १९८३ मध्ये तात्यासाहेब कोरे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची उभारणी करण्यात आली.

जो मुलगा १० वी पास अथवा नापास आहे. त्याला तांत्रिक शिक्षणाची, तंत्र कौशल्याची माहिती मिळावी व स्वतःच्या पायावर त्याला उभे राहता यावे हा या संस्था स्थापनेचा मुख्य उद्देश होता. या संस्थेमध्ये वेल्डिंग, फिटींग, इलेक्ट्रीक, इलेक्ट्रॉनिक्स्, पत्रे कारागीर, आरेखक स्थापत्य, आरेखक यांत्रिकी इ. विषयाचे कोर्सेस उपलब्ध आहेत.

**७) तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग ॲन्त टेक्नॉलॉजी, वारणानगर (टि. के. आय. ई. टी.) :-**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च तांत्रिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देशाच्या पुरोगामी धोरणानुसार श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाने श्री वारणा सहकारी साखर कारखान्याच्या प्रेरणेने ५ सप्टेंबर १९८३ रोजी तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, या संस्थेची स्थापना केली. या ठिकाणी सध्या अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू आहे.

या अभियांत्रिकी महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हील, केमीकल, मेकॅनिकल, कॉम्प्युटर, इन्फरमेशन टेक्नॉलॉजी या शाखांचे पदवीपर्यंतचे अभ्यासक्रम शिकविले जातात. तसेच

पदव्युत्तर शिक्षणासाठी केमीकल अभियांत्रिकीचे पूर्णवेळ व इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी कोर्स पूर्ण करणेसाठी सुट्टीतील अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

सध्या ह्या महाविद्यालयामध्ये २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात १,३८१ पदवीपर्यंतचे तसेच २३ विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत. तसेच सर्व विद्यार्थ्यांना, विद्यार्थीनींना राहण्यासाठी स्वतंत्र वसतीगृहाची उभारणी केली आहे. ह्या तंत्रशिक्षणाचा मुख्य हेतू म्हणजे प्रत्येक तरूणाला त्याच्या ह्या तांत्रिक ज्ञानाद्वारे स्वत:च्या पायावर उभे राहता यावे त्याचबरोबर नोकरीच्या पाठीमागे न धावता घरगुती स्वरूपात का होईना स्वत:चा उद्योगधंदा उभारता यावा हा आहे.

## ८) <u>तात्यासाहेब कोरे ट्रेनिंग कम प्रॉडक्शन सेंटर, वारणानगर</u> :-

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन प्रशिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यापूर्वी प्रत्यक्षात अधिक अनुभव मिळावा तसेच काही प्रमाणात प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार उपलब्ध होऊन त्यामधून प्रत्यक्ष निर्मिती व्हावी या उद्देशाने ऑगस्ट १९८४ मध्ये ट्रेनिंग कम प्रॉडक्शन सेंटरची स्थापना करण्यात आली.

या संस्थेमार्फत ऑफीस, घरगुती व हॉस्पीटल, शाळा साठी आवश्यक असणाऱ्या फर्निचरचे उत्पादन केले जाते. तसेच फॅब्रीकेशनची कामे केली जातात. वाजवी किंमतीमध्ये दर्जेदार साहित्य पुरविणारी संस्था म्हणून या संस्थेचा नावलौकीक आहे.

तसेच या संस्थेने सन १९८६ पासून विद्युत मोटार पंप दुरूस्ती विभाग सुरू केला आहे. वारणा परिसरातील शेतकऱ्यांना विद्युत मोटर्स व पंप दुरूस्तीसाठी यामुळे दुर जाणे वाचले आहे.

याशिवाय या संस्थेने विद्युत ठेकेदार परवाना मिळवून घरगुती वायरिंगची कॉंट्रॅक्टस् सुरूवात केली आहेत. तसेच ऊस वाहतुकीसाठी लोखंडी बैलगाड्यांची निर्मिती नव्याने सुरू करण्यात आली आहे.

## ९) <u>तात्यासाहेब कोरे इंग्लिश ॲकॅडमी, वारणानगर</u> :-

या संस्थेची स्थापना सन १९९४ मध्ये करण्यात आली. आजच्या ह्या स्पर्धेच्या युगात इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची फार आवश्यकता आहे. या आव्हानासाठी वारणेच्या परिसरातील लहान मुलांना इंग्रजी शिक्षणाची सोय करणेसाठी हा या संस्था स्थापनेमागील मूळ उद्देश होता. याठिकाणी बालवाडी-लहानगट व मोठा गट हे दोन वर्ग सुरू करण्यात आले आहेत.


## १०) <u>तात्यासाहेब कोरे मिलीटरी ॲकॅडमी, वारणानगर</u> :-

या संस्थेची स्थापना सन १९९७ मध्ये झाली. या संस्थेच्या स्थापने पाठीमार्गील मुख्य हेतू म्हणजे मिलिटरी शिस्तीचे शिक्षण प्राथमिक अवस्थेपासून मुलांना मिळावे. तसेच या प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता समाजाला समजावी हा होता. या शिक्षण संस्थेतील मुलांनी मिलीटरीच्या शिस्तीप्रमाणे यश संपादन करण्याचा प्रयत्न केला आहे.


या तात्यासाहेब कोरे मिलीटरी ॲकॅउमी या शाळेतून बाहेर पडणारा विद्यार्थी भविष्यकाळामध्ये मातृभूमी व देशाच संरक्षण करण्यासाठी जबाबदार नागरिक तयार होईल असे ह्या सैनिकी शाळेचे स्वप्न आहे.

वारणानगरचे भौगोलिक स्थान आणि वारणानगर मधील सहकारी संस्थांची ठिकाणे दाखविणारा नकाशा पुढील पानावर आहे.

# WARANANAGAR : LOCATION MAP



# CO-OPERATIVES IN WARANANAGAR



## ※ संदर्भ ※

१) कोरे, तात्यासाहेब : 'मी एक कार्यकर्ता' (पूर्वार्ध व उत्तरार्ध) पुस्तिका, प्रकाशक - मा. तात्यासाहेब कोरे षष्ठ्यब्दिपूर्ती समारंभ समिती दि. १ डिसेंबर, १९७४.

२) कोरे, तात्यासाहेब : 'ग्रामीण विकासामध्ये सहकाराचे महत्व' सहकारी विश्व दिवाळी अंक, नोव्हेंबर, १९७८, पान नं. ६ व ७.

३) कोरे, तात्यासाहेब : 'सहकारी साखर कारखान्याचे योगदान'.

४) प्रा. डॉ. नाडगोंडे गुरूनाथ : अमृतरंग पुस्तिका, (इ. स. १९७४ ते १९८४ या दशकातील तात्यासाहेब कोरे यांची निवडक व्याख्याने), प्रकाशक - मा. तात्यासाहेब कोरे अमृत महोत्सव समिती, श्री वारणा सहकारी साखर कारखाना लि. वारणानगर.

५) प्रा. डॉ. नाडगोंडे, गुरूनाथ : 'निष्ठावंत भूमिपुत्र : तात्यासाहेब कोरे सहकारी विश्व', डिसेंबर १९९४, पान नं. ३ व ४.

६) प्रा. डॉ. नाडगोंडे गुरूनाथ : 'समर्थ, संपन्न, समर्पित सुंदर सहकाराचा साक्षात्कार : स्व. तात्यासाहेब कोरे सहकारी विश्व', डिसेंबर, १९९४, पान नं. ७.

७) वारणा परिसर अभ्यास पुस्तिका, वारणा सहकारी साखर कारखान्याचे प्रकाशन.

८) हंज, संजय : 'ऊस विकासासाठी साखर उद्योगास मार्गदर्शक ठरलेला वारणा पॅटर्न', सहकारी विश्व विशेषांक, मार्च २०००, पान नं. ७.

※※※※※